15 APR 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फुले-शाहू-आंबेडकरी विचारांचा वारसा वृद्धींगत करावा

## समाजशास्त्रज्ञ डॉ. रमेश कांबळे : शिवाजी विद्यापीठात डॉ. आंबेडकर जयंतीदिनी व्याख्यान, विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजाला सामूहिक शहाणपणाचा समृद्ध वारसा दिला. हा वारसा वृद्धिंगत करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा वारसा पुढे नेणे, हेच त्यांच्या कार्याचे खरे फलित ठरेल, असे प्रतिपादन समाजशास्त्रज्ञ डॉ. रमेश कांबळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्यावतीने आयोजित 'फुले-शाहू-आंबेडकर' सप्ताहांतर्गत डॉ. आंबेडकर जयंतीदिनी शुक्रवारी 'डॉ. आंबेडकर आणि सार्वजनिक चिकित्सक अवकाश" यावर ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. रमेश कांबळे. शेजारी डॉ. श्रीकृष्ण महाजन, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे.

दिगंबर शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. कांबळे म्हणाले, फुले-शाहू-आंबेडकर हे समाजातील विविध प्रश्नांचा साकल्याने विचार करून त्यांच्या मूलभूत पुनर्रचनेसाठी आग्रही असणारे नेते होते. समाजाची मानसिक जडणघडण ही मानवी मूल्यांवर होणे, त्यांना अभिप्रेत होते. आज समाजात परस्परभेद, विषमता, असंवेदनशीलता मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे आपण एक राष्ट्र म्हणून कसे उभे राहणार, हा प्रश्न आहे. मानवी मूल्यांप्रती समर्पणशीलता आल्यानंतरच खऱ्या अर्थाने फुले-शाहू-आंबेडकरी विचार रूजेल.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. आंबेडकर यांचे वाचन व ग्रंथप्रेम या दोन गोष्टी विद्यार्थ्यांनी आत्मसात केल्यास त्यांच्या जीवनाला अर्थ प्राप्त होईल. महापुरुषांच्या चरित्रावरुन शक्य तितके शिकण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी स्वागत केले. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहांतर्गत आयोजित वक्तृत्व स्पर्धांतील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी साळुंखे, डॉ. शरद बनसोडे आदी उपस्थित होते.

### वक्तृत्व स्पर्धेत तेजस्विनी पांचाळ, शुभम राऊत प्रथम

**स्पर्धेचा निकाल असा :** पदव्युत्तर गट : तेजस्विनी पांचाळ (डी.आर.के. कॉलेज ऑफ कॉमर्स), बन्सी होवाळे (शिक्षणशास्त्र अधिविभाग), मोहन कांबळे (विधी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ). पदवी स्तर गट : शुभम राऊत (डॉ. घाळी महाविद्यालय, गडहिंग्लज), साक्षी बावडेकर (श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी), विधिरा विभूते (विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर). उत्तेजनार्थ- ज्ञानेश्वरी सालगर (संत गजानन महाराज कॉलेज ऑफ फार्मसी, महागाव), अरविंद कांबळे (न्यू कॉलेज, कोल्हापूर), जयेश बागूल (डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, शिवाजी विद्यापीठ).

15 APR 2023
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ...तर राष्ट्र म्हणून कसे उभे राहणार : रमेश कांबळे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आज समाजात परस्परभेद, विषमता आणि अन्य समाजाच्या दुःखाबद्दलची असंवेदनशीलता मोठ्या प्रमाणात आहे. आपण एक समाज म्हणून जर एकत्र येऊ शकत नसू, तर एक राष्ट्र म्हणून कसे उभे राहू शकू, हा आजघडीचा कळीचा मुद्दा आहे, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे समाजशास्त्रज्ञ डॉ. रमेश कांबळे यांनी शुक्रवारी येथे केले. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजाला सामूहिक शहाणपणाचा समृद्ध वारसा दिला. हा वारसा वृद्धिंगत करणे हेच त्यांच्या कार्याचे खरे फलित ठरेल, असेही त्यांनी सांगितले.



शिवाजी विद्यापीठात गुरुवारी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे समाजशास्त्रज्ञ डॉ. रमेश कांबळे यांचे व्याख्यान झाले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या 'फुले-शाहू-आंबेडकर' सप्ताहांतर्गत डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त ते बोलत होते. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सार्वजनिक चिकित्सक अवकाश' या विषयावर त्यांचे शाहू सभागृहात व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

डॉ. कांबळे म्हणाले, फुले-शाहू-आंबेडकर हे समाजातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व आर्थिक समस्यांचा साकल्याने विचार करून त्यांच्या मूलभूत पुनर्रचनेसाठी आग्रही असणारे नेते होते. समाजाची मानसिक जडणघडण ही मानवी मूल्यांवर होणे त्यांना अभिप्रेत होते. असमानता, शोषण, अन्याय आणि गुलामगिरी या मुद्द्यांना भिडल्याखेरीज 'भारत' ही संकल्पना पूर्णत्वास जाऊ शकत नाही.

## संशोधनासाठी विचार

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वाचन व ग्रंथप्रेम या किमान दोन गोष्टी आजच्या विद्यार्थ्यांनी आत्मसात केल्या, तरी त्यांच्या जीवनाला अर्थ प्राप्त होईल. मुंबई आणि शिवाजी विद्यापीठाने डॉ. आंबेडकर आणि शाहू महाराज यांच्या अनुषंगाने काही संयुक्त संशोधन प्रकल्प हाती घेता येतील का, याचा विचार जरूर करावा.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचेही भाषण झाले. डॉ. आंबेडकर केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 APR 2023
पुण्यनगरी

# फुले-शाहू-आंबेडकरांकडून सामूहिक शहाणपणाचा वारसा : डॉ. रमेश कांबळे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजाला सामूहिक शहाणपणाचा समृद्ध वारसा दिला आहे. हा वारसा वृद्धिंगत करणे हेच त्यांच्या कार्याचे खरे फलित ठरेल, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे समाजशास्त्रज्ञ डॉ. रमेश कांबळे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या 'फुले-शाहू-आंबेडकर' सप्ताहांतर्गत शुक्रवारी डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानाचे प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सार्वजनिक चिकित्सक अवकाश' या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले.

अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. आंबेडकर केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन, सूत्रसंचालन डॉ. अविनाश भाले यांनी केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी साळुंखे, डॉ. शरद बनसोडे आदी उपस्थित होते.

डॉ. आंबेडकर केंद्रातर्फे फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहांतर्गत पदव्युत्तर व पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या वक्तृत्व स्पर्धांचे बक्षीस वितरण कुलगुरू, तसेच प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झाले. गटनिहाय विजेते अनुक्रमे, पदव्युत्तर गट : तेजस्विनी पांचाळ (डी.आर.के कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर), बन्सी होवाळे (शिक्षणशास्त्र अधिविभाग), मोहन कांबळे (विधी अधिविभाग). पदवी स्तर गट : शुभम राऊत (डॉ. घाळी महाविद्यालय, गडहिंग्लज), साक्षी बावडेकर (श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी), विधिरा विभूते (विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर). उत्तेजनार्थ- ज्ञानेश्वरी सालगर (संत गजानन महाराज कॉलेज ऑफ फार्मसी, महागाव), अरविंद कांबळे (न्यू कॉलेज, कोल्हापूर), जयेश बागूल (डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी).



पुण्यनगरी



विद्यापीठाच्या विधी विभागातील विद्यार्थ्यांनी कळंबा कारागृहास भेट दिली.

# विद्यापीठाच्या विधी विभागातील विद्यार्थ्यांची कळंबा कारागृहास भेट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या विधी विभागाच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमांतर्गत मध्यवर्ती कळंबा कारागृहास भेट दिली. कारागृहातील विधी, तसेच कायद्याशी निगडित विविध पद्धती, कारागृहातील नियम पद्धती या सगळ्यांची विद्यार्थ्यांना जवळून ओळख व्हावी म्हणून या अभ्यास दौऱ्याचे विभागप्रमुख डॉ. विवेक धूपदाळे यांनी आयोजन केले होते.

कळंबा कारागृहातील सोयी-सुविधा, नियोजन, रुग्णालय, भोजन, बेकरी, लाडू विभाग, ग्रंथालय, रेडिओ स्टेशन, कारखाना, शेती याबाबतची सविस्तर माहिती कारागृह अधीक्षक पांडुरंग भुसारी यांनी दिली. यावेळी कारागृहातील कारखाने, हातमाग, सुतारकाम, जरीवर्क, शेती, उच्च शिक्षण व इतर समाजप्रबोधन कार्यक्रम आदींबाबत विद्यार्थ्यांना तुरुंगाधिकारी (द्वितीय श्रेणी) प्रकाश लोमटे, पोलीस कर्मचारी महेंद्र पाटील, ओंकार वागडोळे यांनी माहिती दिली. विधी विभागाचे सचिव प्रमोद दाभाडे यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्रा. माधवी माळगे, प्रियंका जाधवर, राम गोपलानी, औदुंबर बनसोडे, प्रियंका गुरव, हेमा जाधव, तेजस्विनी कासे, अरविंद पाटील, गौरव जवळकर, जयदीप कदम, नागेश दरेकर, यश हेगडे-पाटील, नेहा राजपूत, अश्विनी पाटील आदी उपस्थित होते.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात आंबेडकर जयंती उत्साहात

शिवाजी विद्यापीठात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंती मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरी करण्यात आली.

मुख्य प्रशासकीय भवन इमारतीच्या पोर्चमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी अभिवादन केले. यावेळी डॉ. रणधीर शिंदे, कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते डॉ. रमेश कांबळे, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. प्रकाश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. तानाजी साळुंखे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे उपस्थित होते.

## जिल्हा परिषदेमध्ये जयंती

जिल्हा परिषदेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी अरुण जाधव, मनीषा देसाई, डॉ. योगेश साळे, सचिन सांगावकर, दीपक घाटे उपस्थित होते.

लोकमत

# वक्तृत्व स्पर्धेत तेजस्विनी पांचाळ, शुभम राऊत प्रथम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्राच्यावतीने फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहांतर्गत पदव्युत्तर व पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या वक्तृत्व स्पर्धांचे बक्षीस वितरण कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते शुक्रवारी झाले.

**स्पर्धेचा निकाल असा : पदव्युत्तर गट** - तेजस्विनी संजय पांचाळ (डी. आर. के. कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर), बन्सी रमेश होवाळे (शिक्षणशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर), मोहन मुकुंद कांबळे (विधी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर).

**पदवी स्तर गट**- शुभम दशरथ राऊत (डॉ. घाळी महाविद्यालय, गडहिंग्लज), साक्षी सुनील बावडेकर (श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी), विधिरा राजाराम विभूते (विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर). उत्तेजनार्थ- ज्ञानेश्वरी लक्ष्मण सालगर (संत गजानन महाराज कॉलेज ऑफ फार्मसी, महागाव), अरविंद शंकर कांबळे (न्यू कॉलेज, कोल्हापूर), जयेश बागूल (डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर).

लोकमत

# कणबरकर यांचा स्मृतिदिन साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : येथील भाई माधवराव बागल विद्यापीठाचे माजी उपाध्यक्ष व माजी कुलगुरू डॉ. रा. कृ. कणबरकर यांचा आठवा स्मृतिदिन बागल विद्यापीठात गुरुवारी साजरा करण्यात आला.

विद्यापीठाचे ज्येष्ठ संचालक संभाजीराव जगदाळे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी भाई माधवराव बागल विद्यापीठाचे संचालक चंद्रकांत यादव, अनिल घाटगे, जितेंद्र कांबळे, सचिव परशुराम माने व कार्यकर्ते उपस्थित होते.